जाहिरात क्र.१/६०४,

दि.१५.११.२०१८

**मुख्य अग्निशमन अधिकारी कार्यालय**

**पुणे महानगरपालिका**

# दैनिक मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात सेवा घेणेबाबत

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अग्निशमन दल कार्यालयाकडे मदतनीस म्हणून चार महिने (१२० दिवस) मुदतीकरिता दैनिक मानधन (रू.६३८.६५/-) तत्वावर नेमणूकीसाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक व तांत्रिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदांची जातीच्या गटनिहाय संख्या | शैक्षणिक, शारीरिक व तांत्रिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | मदतनीस | एकूण पदे : ५०<br>अ.जा.-०७., अ.ज.-०४.<br>वि.जा.अ.-०१, भ.ज.ब.-०१.<br>भ.ज.क.-०२., भ.ज.ड.-०१.<br>वि.मा.प्र.-०१., इ.मा.व.-०९.<br>खुला - २४. | १)उमेदवार इयत्ता १० वी उत्तीर्ण असावा.<br>२)महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र) चा ०६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) उंची = ५ फूट ६ इंच.,<br>छाती = ३२ इंच (न फूगवता ), ३४ इंच (फुगवून),<br>वजन = किमान ५० कि.ग्रॅ.<br>४) उमेदवारास पोहता येणे आवश्यक.<br>५) उमेदवारास कोणताही शारिरिक व्यंग नसावा. |

**अटी :-**

१) वयोमर्यादा : जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षे, कमाल वय ३८ वर्षे (मागास जातीच्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षांसाठी शिथिल) असावे. सदर उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२) वरील पदासाठी मा. महापालिका आयुक्त यांचे नावे असणारा पुणे मनपाच्या www.punecorporation.org किंवा www.pmc.gov.in या वेबसाईटवर असणारा छापील अर्ज **Download** करण्यात यावा. सदरचा अर्ज सुवाच्च अक्षरात संपूर्णपणे भरून मुख्य अग्निशमन अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती अग्निशमन केंद्र, महात्मा फुले पेठ, टिंबर मार्केटजवळ, पुणे ४११०४२ या पत्त्यावरील कार्यालयामध्ये दिनांक २७/११/२०१८ रोजीपर्यंत सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.४५ या कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्या वगळून) समक्ष सादर करावा. पोस्टाद्वारे प्राप्त होणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३) सदर अर्जासोबत जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मदाखला / शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारीख नमूद असलेल्या शालांत परिक्षा प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत, शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी प्रमाणपत्र, अनुभव विषयक प्रमाणपत्रे, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र यांच्या साक्षांकित छायाप्रती सोबत जोडून, अर्जावर स्वत:चा एक पासपोर्ट साईज फोटो लावण्यात यावा.

४) अर्धवट भरलेला, अपुरी कागदपत्रे असणारा, चुकीची /विसंगत माहिती असणारा तसेच वरील नमूद दिनांकानंतर प्राप्त होणारा अर्ज प्रक्रियेसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५) वरील नमूद पदासाठीची नेमणूक ही दैनिक हजेरीनुसार आज्ञापत्राच्या दिनांकापासून पुढील ०४ महिने (१२० दिवस) तात्पुरत्या कालावधीकरिता असेल. त्यानंतर ही नेमणूक संपुष्टात येईल.

६) सदरील प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करण्याचे, नियुक्तीबाबतचे तसेच नियुक्तीनंतर ०४ महिने कालावधीमध्ये केव्हांही सदरील नेमणूका रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांनी राखून ठेवलेले आहेत.

Scanned by CamScanner

७) सदर नियुक्त्या या पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपातील असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना पुणे मनपाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर नियुक्तीकरिता हक्क सांगता येणार नाही. तसेच पुणे मनपाच्या कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ, हक्क मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

८) सदर पदाकरिता घेण्यात येणाऱ्या शारीरिक चाचणीसाठी संबंधित उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. शारीरिक चाचणी दरम्यान उमेदवारास कोणत्याही स्वरूपाची दुखापत / इजा झाल्यास त्याची कोणत्याही प्रकारची जबाबदारी पुणे मनपावर राहणार नाही.

९) निवड झालेल्या उमेदवारांना त्यांचे एक महिन्याचे मानधनाइतकी रक्कम प्रत्यक्ष कामावर हजर होणेपूर्वी पुणे महानगरपालिकेकडे अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच रू.१००/- चे मुद्रांकावर करारनामा करून द्यावा लागेल व यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना पुणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडील सध्या कार्यरत असलेल्या किंवा नव्याने सुरू होणाऱ्या कोणत्याही अग्निशमन केंद्राकडे खात्याकडील शिफ्टपद्धतीनुसार नेमणूक देण्यात येईल.

११) शारीरिक क्षमता चाचणी घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यालयीन कामकाजाच्या १५ दिवसांमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची यादी पुणे महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच निवड न झालेल्या उमेदवारांना माहिती देणेस कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

**कामाचे स्वरूप :** आपत्ती निवारणाचे काम करणाऱ्या अग्निशमन दलाकडील फायरमन सेवकांना आवश्यक ती मदत करणे, केंद्रांतर्गत विविध कामे करणे.

**निवड व गुणदान पद्धती :** एकूण ३० गुणांची शारिरिक चाचणी घेण्यात येईल.

१) शारीरिक चाचणीमध्ये १०० मी. कॅज्युलिटीसह धावणे हा प्रकार २० सेकंदात पूर्ण करणाऱ्यास १५ गुण व २० सेकंदापेक्षा जास्त सेकंद घेणाऱ्यास प्रत्येक अधिकच्या सेकंदासाठी एक गूण वजा करून गूण देण्यात येतील.

२) शिडी चढणे व उतरणे (एक्सटेंशन लॅडर चढणे व उतरणे) हा प्रकार २५ सेकंदात पूर्ण करणाऱ्या उमेदवारास १५ गूण व त्यापेक्षा जास्त सेकंद घेणाऱ्या उमेदवाराचे प्रत्येक अधिकच्या सेकंदासाठी एक गूण वजा करून गुण देण्यात येतील.

३) पोहण्याची चाचणी ही फक्त उमेदवारास पोहता येते अथवा कसे हे तपासण्यासाठी घेण्यात येईल. त्यास कोणतेही गूण देण्यात येणार नाही.

४) उमेदवारास अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण करताना ७० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविले असल्यास ०२ बोनस गूण त्या उमेदवारास देण्यात येतील.

५) दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गूण मिळाल्यास ज्या उमेदवाराने आधी अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण केला असेल त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

६) वरीलप्रमाणे चाचणी घेऊन त्यामध्ये जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांची जातीच्या गटामध्ये नमूद पदांच्या संख्येनुसार निवडयादी व अतिरिक्त यादी करण्यात येईल.

(प्रशांत दा. रणपिसे)
मुख्य अग्निशमन अधिकारी
पुणे महानगरपालिका

Scanned by CamScanner

# मुख्य अग्निशमन अधिकारी कार्यालय
# पुणे महानगरपालिका, पुणे.
## मदतनीस म्हणून दैनिक मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूकीसाठी अर्ज.

---

फोटो चिकटवून त्यावर
स्वत: ची स्वाक्षरी करावी

प्रति,
मा. महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका
यांजकडेस सविनय सादर

विषय : पुणे महानगरपालिका अग्निशमन दलाकडे मदतनीस म्हणून चार महिने कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात दैनिक मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक मिळणेबाबत.

संदर्भ : जाहिरात क्र : ----------, दिनांक :

महोदय,

आपल्या संदर्भिय जाहिरातीस अनुसरून मी पुणे महानगरपालिका अग्निशमन दलाकडे मदतीनस म्हणून चार महिने कालावधीत तात्पुरत्या स्वरूपात दैनिक मानधन तत्वावर नेमणूक मिळणेकरीता अर्ज सादर करीत आहे. याकामी आवश्यक असणाऱ्या पात्रता निकषानुसार माझी पात्रतेविषयक माहिती पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम): ------------------------------------------------

२) सध्याचा राहण्याचा संपूर्ण पत्ता : --------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

३) पत्रव्यवहाराचा पत्ता (जवळच्या खुणेसह) : -------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

------------------------------------मोबाईल क्रमांक :---------------------------

४) अर्ज ज्या जातीच्या गटातून नियुक्ती मिळणेसाठी केला आहे तो जातीचा गट :--------------------------

( खुला / अ.जा./अ.ज./ वि.जा.अ./भ.ज.ब./भ.ज.क./भ.ज.ड./वि.मा.प्र./इ.मा.व.)

५) इयत्ता १० वी उत्तीर्ण ( वर्ष व कितवा प्रयत्न ते नमूद करावे (वर्ष -------------, प्रयत्न ------------)

६) महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र) चा ०६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण ( वर्ष व कितवा प्रयत्न ते नमूद करावे (वर्ष -------------, प्रयत्न -------------)

...२/-

Scanned by CamScanner

७) जात व जातीचा गट : ------------------------------------------------

जात प्रमाणपत्र क्रमांक : ------------------------------------------------

जात पडताळणी प्रमाणपत्र क्रमांक : ----------------------------------------

८) जन्म दिनांक : ----------------------------------------------------

जन्म दिनांकाचा पुरावा : -----------------------------------------------

९) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र :-------------------------------------

१०) कामाच्या अनुभव विषयक माहिती : ----------------------------------------

--------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

वरीलप्रमाणे पात्रताविषयक कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती सोबत जोडल्या असून सदरील माहिती ही पूर्णपणे खरी आहे. सदरील माहिती खोटी असल्याचे आढळल्यास सदर प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्यावर माझा अर्ज / नियुक्ती रद्द करून माझेवर नियमानुसार योग्य ती कारवाई होणेस मी पात्र असेन, याची मला पूर्ण जाणीव आहे. संदर्भिय जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी मी वाचल्या असून, त्या मला मान्य आहेत.

तरी मला पुणे महानगरपालिका अग्निशमन दलाकडे मदतनीस म्हणून चार महिने कालावधीत तात्पुरत्या स्वरूपात दैनिक मानधन तत्वावर नेमणूक मिळणेस विनंती आहे.

मा.स कळावे.

(पुणे महानगरपालिका)

अर्जदाराची स्वाक्षरी व नाव

सोबत : वरील नमूद पात्रताविषयक कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती.

Scanned by CamScanner